


मराठवाडा मुक्तीदिन महोत्सवाच्या वतीने रविवारी पुण्यात शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्यासह सहा जणांना 'मराठवाडा भूषण' पुरस्कार प्रदान करण्यात आला. याप्रसंगी (डावीकडून) दत्ताजी म्हेत्रे, शमशुद्दीन तांबोळी, किशोर पिंगळीकर, ईश्वरदास घनघाव, किरण गित्ते, डॉ. देवानंद शिंदे, हनुमंतराव गायकवाड, श्रीपाल सबनीस, राजकुमार धुरगुडे, ओमप्रकाश पेठे, सुभाष वारे उपस्थित होते.

## श्रीपाल सबनीस : देवानंद शिंदे यांना मराठवाडा भूषण पुरस्कार प्रदान

# शेतकऱ्यांच्या मरणावर सरकार भोगतेय सिंहासन

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** शेतकरी अनेक समस्यांना त्रस्त होऊन आत्महत्या करत आहे. त्या गोष्टी सरकार लक्षात घेत नाही. त्यांच्या डोक्यावरील कर्ज कमी न करता पिळवणूक करत आहे आणि त्यांच्या मरणावर सिंहासन भोगत आहे, अशी टीका ज्येष्ठ साहित्यिक श्रीपाल सबनीस यांनी केली आहे. मराठवाडा समन्वय समितीने बालगंधर्व येथे आयोजित केलेल्या मराठवाडा मुक्तीदिन पुरस्कार सोहळ्याच्या कार्यक्रमात ते बोलत होते.

श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते विविध क्षेत्रांतील सहा मान्यवरांचा पुरस्कार देऊन सत्कार करण्यात आला.

त्यामध्ये शैक्षणिक पुरस्कार शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे, सामाजिक पुरस्कार सामाजिक कार्यकर्ते सुभाष वारे, प्रशासकीय पुरस्कार पी.एम.आर.डी.ए चे किरण गित्ते, कला साहित्य पुरस्कार लेखक व सामाजिक कार्यकर्ते शमशुद्दीन तांबोळी, उद्योजक पुरस्कार एक्स्पोनेन्शियल इंजिनिअरिंगचे व्यवस्थापकीय संचालक ओमप्रकाश पेठे आणि कृषी पुरस्कार प्रगतशील शेतकरी ईश्वरदास घनघाव यांना देण्यात आले. यावेळी बीव्हीजी इंडिया चे संस्थापक हनुमंतराव गायकवाड, मराठवाडा समन्वय समितीचे अध्यक्ष राजकुमार धुरगुडे पाटील, उपाध्यक्ष किशोर पिंगळीकर आदि उपस्थित होते.

सबनीस म्हणाले, शेतकऱ्यांसाठी मकरंद अनासपुरे, नाना पाटेकर यांनी नाम ही संस्था उघडली. त्यांच्याशी शेतात जाऊन त्या मातीत उतरून संवाद केला. सरकारला जमले नाही ते कलावंत करत आहेत. सरकार संवेदनशील होणार नाही तोपर्यंत समाज पण तसाच राहील.

भारत देश हा गांधी, बुद्ध आणि आंबेडकर यांचा देश आहे. त्यांच्या शिकवणीचा उपयोग भारताने केला पाहिजे. मराठवाड्यातील तरुणांनी कुठंही न जाता आपल्या मातीत शिक्षण घ्यावे. यासाठी मराठवाडा समन्वय समिती पुढाकार घेऊन सर्व सुखसुविधा मराठवाड्यात उपलब्ध करून देईल.

मराठवाड्यातील कारखाने, पाणी प्रश्न अशा अनेक प्रश्नांना हात घालून ते सोडवण्यासाठी समितीने प्रयत्न करावे.

गायकवाड म्हणाले, माणसाने माणसाला माणूस म्हणून जगायला शिकवले पाहिजे. प्रत्येक माणसाने आपल्या कामासाठी योगदान द्यावे आणि आपल्या आजूबाजूला असणाऱ्या लोकांनाही मोठे होण्यासाठी मदत करावी. तेव्हा भारताला महासत्ता होण्यापासून कोणीच रोखणार नाही. शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी भारत विकास ग्रोथ सतत प्रयत्नशील आहे. या संस्थेशी जोडणाऱ्या शेतकऱ्यांचे उत्पन्न ३ वर्षात वाढेल. जगात अनेक संधी आहेत की ज्याचा भारताला उपयोग होईल अशा संधीचा शोध घेतला पाहिजे. शेतकऱ्यांसाठी गाव दत्तक योजनेत गावे दत्तक घेऊन ती सुधारण्यासाठीआमची संस्था सतत प्रयत्नशील राहील.

सत्कारार्थींनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक दत्ताजी म्हेत्रे यांनी केले. महेश पाटील, स्नेहल इनामदार यांनी सूत्रसंचालन केले.

18 SEP 2017 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कुमावत सोसायटीने समाज हितास प्राधान्य द्यावे : डॉ. शिर्के

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

कुमावत सोसायटी ही कुंभार समाजाची हक्काची सोसायटी आहे. समाजातील गरजू कुंभार बांधवांना कर्जाच्या रूपाने आर्थिक मदत करून त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी प्रयत्न केले, असे गौरद्गार शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी काढले.

कुमावत को-ऑप. क्रेडीट सोसायटीची ७५ वी अमृतमहोत्सवी वार्षिक सभा नुकतीच झाली. यावेळी ते बोलत होते. संस्थेचे अध्यक्ष संजय निगवेकर यांच्या अध्यक्षतेखाली ही सभा झाली. शिवाजी विद्यापीठाच्या प्र-कुलगुरूपदी निवड झाल्याबद्दल डॉ. शिर्के यांचा अध्यक्ष निगवेकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. शासनाचा कृषीभूषण पुरस्कार मिळाल्याबद्दल मच्छिंद्र कुंभार यांचाही सत्कार करण्यात आला.

अध्यक्ष निगवेकर यांनी सभासदांना १२ टक्के लाभांष व संस्थेस ७५ वर्षे पूर्ण झालेबद्दल सभासदांना भेटवस्तू म्हणून प्रत्येकी तीन स्टीलची ताटे देण्यात येतील, असे जाहीर केले. संस्थेच्या वतीने वर्षभर राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांची माहिती संचालक एम. व्ही. कुंभार यांनी दिली. तसेच संस्थेचा विस्तार करण्याचा मानस संचालक मंडळाने व्यक्त केला आहे. सहकार खात्याने नवीन शाखेला मंजुरी दिली असून लवकरच नवीन शाखा सुरू करण्यात येईल, तसेच या शाखेमध्ये उत्पन्नाचा स्रोत म्हणून वीजबिल भरणार केंद्रही सुरू करण्यात येईल, असेही एम. व्ही. कुंभार यांनी सांगितले. संस्थेचे व्यवस्थापक महेश कुंभार यांनी अहवाल वाचन केले. तसेच सभासदांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे दिली. आभार नारायण खुपेरकर यांनी मानले.

18 SEP 2017

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**शिवाजी विद्यापीठ :** निवडणूक कार्यक्रम जाहीर; कच्ची मतदार यादी प्रसिद्ध; २० नोव्हेंबरला मतमोजणी

# विविध अधिकार मंडळासाठी १७ नोव्हेंबरला मतदान

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील अधिसभा, विद्या परिषद, विविध विद्याशाखांच्या अभ्यास मंडळांच्या निवडणुकीचा कार्यक्रम विद्यापीठ प्रशासनाने शुक्रवारी जाहीर केला. या सर्व अधिकार मंडळांवरील १८८ जागांसाठी दि. १७ नोव्हेंबरला मतदान होणार आहे.

विद्यापीठाची अधिकार मंडळे नवीन विद्यापीठ कायद्यानुसार अस्तित्वात येणार आहेत. अधिसभा, विद्या परिषद, विविध विद्याशाखांच्या एकूण ४७ अभ्यास मंडळांवरील १८८ जागांसाठी निवडणूक घेण्यात येणार आहे. त्यातील अधिसभेसाठी शिक्षक, प्राचार्य आणि नोंदणीकृत पदवीधर



गटाकरिता प्रत्येकी दहा जागा, संस्था प्रतिनिधींच्या सहा, विद्यापीठ कॅम्पसवरील शिक्षकांच्या तीन जागा आहेत. त्यासह विद्या परिषदेसाठी शिक्षक गटातील आठ जागा आहेत. विविध विद्याशाखांच्या एकूण ४७ अभ्यास मंडळांवरील प्रत्येकी तीन अशा एकूण १४१ जागांचा समावेश आहे. त्यातील नोंदणीकृत पदवीधर गटासाठीची नोंदणीची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. त्यात १४ हजार ४०० पदवीधर मतदानासाठी सध्या पात्र ठरले आहेत. या निवडणुकीचा कार्यक्रम विद्यापीठ प्रशासनाने शुक्रवारी सायंकाळी जाहीर केला. त्यासह तात्पुरती मतदार यादी प्रसिद्ध केली. या मतदार यादीस दुरुस्ती सुचविण्याची अंतिम मुदत दि. २० सप्टेंबरला सायंकाळी पाच वाजेपर्यंत आहे. अंतिम मतदार यादीची प्रसिद्धी दि. १२ ऑक्टोबरला होणार आहे. त्यानंतर निवडणुकीची नोटीस दि. २२ ऑक्टोबरला जाहीर करण्यात येणार आहे. विद्यापीठाने कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यांत निश्चित केलेल्या केंद्रांवर दि. १७ नोव्हेंबरला सकाळी नऊ ते सायंकाळी पाच यावेळेत मतदान होणार आहे. दरम्यान, निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाल्यामुळे शिवाजी विद्यापीठ विकास आघाडी, शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघ (सुटा), आदी संघटनांच्या तयारीला वेग येणार आहे.

## निवडणूक कार्यक्रम असा

- उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अंतिम मुदत : ३१ ऑक्टोबर (सायंकाळी पाच वाजेपर्यंत)
- अर्जांची छाननी : २ नोव्हेंबर
- अंतिम मुदत : ४ नोव्हेंबर (सायंकाळी पाच वाजेपर्यंत)
- निवडणुकीसाठी पात्र उमेदवारांच्या यादीची प्रसिद्धी : ६ नोव्हेंबर
- अधिकार मंडळांसाठी मतदान : १७ नोव्हेंबर
- मतमोजणी व निकाल : २० नोव्हेंबर

> “ विद्यापीठाच्या विविध अधिकार मंडळांसाठी विद्यापीठ अधिनियम २०१६ नुसार प्रशासनामार्फत निवडणुका घेण्यात येत आहेत. निवडणुकीसाठीची तात्पुरती मतदार यादी आणि अधिकार मंडळांसाठी निवडून द्यावयाच्या जागांचा तपशील, मतदान केंद्रे, आदींची माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केली आहे.
>
> \- डॉ. विलास नांदवडेकर, कुलसचिव तथा निवडणूक निर्णय अधिकारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

18 SEP 2017
सकाळ

# अधिकार मंडळांच्या निवडणुकीचा बिगुल

## ११ नोव्हेंबरला मतदान, २० ला निकाल

कोल्हापूर, ता. १७ : शिवाजी विद्यापीठाच्या विविध अधिकार मंडळांच्या निवडणुकीचा बिगुल अखेर वाजला आहे. ११ नोव्हेंबरला विविध अधिकार मंडळांसाठी मतदान होत असून, २० नोव्हेंबरला निकाल जाहीर केला जाईल. सकाळी नऊ ते सायंकाळी पाच या वेळेत मतदान होणार आहे. विद्यापीठातर्फे निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला.

पदवीधरांच्या दहा जागांसाठी निवडणूक होत आहे. खुल्या प्रवर्गातील पाच, एक महिला, अनुसूचित जाती एक, अनुसूचित



जमाती एक, विमुक्त जाती-भटक्या जमाती एक, इतर मागासवर्गीय एक अशा जागांसाठी ही निवडणूक आहे. त्याचबरोबर अधिसभेवर घेण्यात येणाऱ्या दहा प्राचार्य, सहा संस्था प्रतिनिधी, दहा महाविद्यालयीन शिक्षक, तीन विद्यापीठ शिक्षक, विद्यापरिषदेवरील आठ शिक्षक (यात एक महिला व एक राखीव संवर्गातून चिठ्ठ्या टाकून काढलेल्या सोडतीद्वारे), तीन महाविद्यालयीन प्रमुख पदांसाठीही निवडणूक होत आहे.

### निवडणूक कार्यक्रम असा :

- मतदार यादीत दुरुस्ती अंतिम तारीख : २० सप्टेंबर
- दुरुस्तीनंतरची अंतिम मतदार यादी : १२ ऑक्टोबर
- निवडणूक नोटीस : २२ ऑक्टोबर
- अर्ज भरण्याची तारीख : ३१ ऑक्टोबर
- अर्ज छाननी : २ नोव्हेंबर
- अर्ज माघार : ४ नोव्हेंबर
- पात्र उमेदवारांची यादी : ६ नोव्हेंबर
- मतदान : १७ नोव्हेंबर
- मतमोजणी व निकाल : २० नोव्हेंबर

18 SEP 2017

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ...त्यामुळेच भारतीय महिलांचे प्रश्न प्रलंबित

## विद्यापीठातील व्याख्यानात प्रा. आनंदकुमार यांचे मत :समाजशास्त्र विभागाच्यावतीने कार्यक्रम

प्रतिनिधी
कोल्हापूर

संसदेमध्ये स्वातंत्र्यानंतरच्या लोकसंख्येच्या प्रमाणात महिलांना प्रतिनिधित्व मिळालेले नाही. त्यामुळे भारतीय महिला ही पूर्ण नागरिक होऊ शकलेली नाही. परिणामी महिलाविषयक अनेक प्रश्न प्रलंबित आहेत, असे मत जवाहरलाल नेहरु विद्यापीठातील समाजशास्त्र विभागाचे माजी प्राध्यापक प्रा. आनंदकुमार यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठातील समाजशास्त्र अधिविभागाने आयोजित केलेल्या विशेष व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी समाजशास्त्र अधिविभागाचे माजी विभागप्रमुख, डॉ. एस. एन. पवार होते.

ते पुढे म्हणाले, स्वातंत्र्यानंतरचे पहिले संकट धर्म आणि भाषावार प्रांत रचनेने केले आहे.



कोल्हापूर : ओकेजनल पेपरचे प्रकाशन करताना प्रा. आनंदकुमार डावीकडून डॉ. प्रतिमा पवार, प्रा. जगन कराडे, प्रा. एस. एन. पवार, प्रा. आर. बी. पाटील, डॉ. प्रल्हाद माने.

जागतिक विकासाच्या क्रमवारीत आपण मागे आहोत. निवडणुकीची प्रक्रिया पैसा, संप्रेक्षण आणि शक्ती प्रदर्शन दोषपूर्ण आहे. शासनाने पोसलेले गुंड विचारु लागलेत की, हे का लिहिले? ते का लिहिले? आसाम, मणिपूर अजूनही असंतोषामुळे संघर्षात आहे. भारतामध्ये अजूनही ७० टक्के लोकांना दिवसभर काम केल्यानंतर १०० टक्के मजुरी मिळते आणि दुसऱ्या बाजूला ३० टक्के लोक संसदेमध्ये प्रगतिशील लोकशाहीचे प्रतिनिधित्व करीत आहेत, असेही त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी २०१६–१७ या सालातील विद्वानांच्या वैचारिक भाषणांच्या ओकेजनल पेपरचे प्रा. आनंदकुमार यांच्या हस्ते प्रकाशन झाले. समाजशास्त्र अधिविभागाचे विभागप्रमुख, डॉ. जगन कराडे यांनी समाजशास्त्र अधिविभागाच्या प्रगतीचा आढावा घेतला. डॉ. प्रतिमा पवार यांनी पाहुण्यांची ओळख करुन दिली. डॉ. प्रल्हाद माने यांनी आभार मानले.

या कार्यक्रमाला समाजशास्त्र अधिविभागाचे माजी विभागप्रमुख, प्रा. डॉ. आर. बी. पाटील सेंटर फॉर सोशल स्टडीज, सुरत येथील डॉ. विमल त्रिवेदी अनेक संशोधक विद्यार्थी व एम. ए. चे विद्यार्थी–विद्यार्थीनी उपस्थित होते.

18 SEP 2017

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यार्थ्यांनी विविध कौशल्ये आत्मसात करावीत

## डॉ. विलास नांदवडेकर

**हलकर्णी / प्रतिनिधी :**
विद्यार्थ्यांनी प्रत्येक गोष्टीकडे संशोधक व चिकित्सक वृत्तीने पाहिल्यास आपला विकास नक्कीच होतो. विद्यार्थ्यांनी विविध कौशल्येआत्मसात करावीत असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी केले. कोवाड येथील कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयाच्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष डॉ. ए. एस. जांभळे होते.

प्रा. एम. व्ही. पाटील यांनी स्वागत केले. डॉ. बी. एल. पाटील यांनी पाहुण्यांचा परिचय करुन दिला. नांदवडेकर पुढे म्हणाले, आपल्या भागातील नैसर्गिक साधन सामग्रीचा व्यवस्थित उपयोग केल्यास या भागाचा विकास होईल. आपण ज्यावेळी एखादी गोष्ट साध्य करण्यासाठी प्रयत्न करतो त्यावेळी यश मिळतेच असे नाही पण प्रयत्नांची चिकाटी आपण सोडू नये. ध्येय साध्य होईपर्यंत ते गाठण्यासाठी आवश्यत ते प्रयत्न करावेत. ध्येयापर्यंतचा प्रवास खडतर असेल पण धेय्यापासून आपण ढळू नये. विद्यार्थी जीवनामध्ये विविध अडचणींना तोंड द्यावे लागते पण त्यातूनही आपण कांही ना कांही शिकण्याचा प्रयत्न करावा. अपयश आले म्हणून खचून न जाता, चुका टाळून, अभ्यासुवृत्ती ठेऊन पदवीबरोबरच विविध कोर्स करावेत तरच उद्याच्या कौशल्यपुर्ण भारत पहायला मिळेल. नोकरीच्या मागे न लागता स्वतःचा व्यवसाय सुरु करण्याचा प्रयत्न करावा. आपल्या मर्यादांवर मात करुन आत्मविश्वासाच्या बळावर विचाराप्रमाणे कृती करावी. नावीन्यपुर्ण स्वप्ने पाहून ती पुर्ण करण्याचा अटोकाट प्रयत्न कारवा.

डॉ. ए. एस. जांभळे म्हणाले, विद्यार्थ्यांनी परिस्थितीचा विचार न करता आपले ध्येय गाठण्याचा प्रयत्न कारवा. तसेच पदवीबरोबरच विविध कोर्सेसचा उपयोग करुन आपला, कुटुंबाचा, समाजाचा व देशाचा विकास साधण्याचा प्रयत्न करावा. समाजाच्या विकासामध्ये सहयोग देणे गरजेचे आहे. यावेळी भरमू पाटील, प्रा. एन. एस. पाटील यांनी मनोगत व्यक्त केले.

यावेळी महाविद्यालयाच्या फलकाचे पुजन विलास नांदवडेकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी पी. एचडी. पदवी प्राप्त ए. एस. आरबोळे व सेट परीक्षा उत्तीर्ण झालेले प्रा. शीतल मंडळे यांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमास डॉ. बी. एल. पाटील, प्रा. एन. एस. पाटील, डॉ. पी. एस. पाटील, प्रा. व्ही. आर. पाटील, बी. के. पाटील, एम. जे. पाटील, याकुब मुल्ला, प्राचार्य प्रकाश कुंभार, रामभाऊ मनवाडकर, बंडू तोगले, गोविंद नांदवडेकर, अशोक पाटील, लक्ष्मण व्हन्याळकर, बाबासाहेब मुल्ला यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. प्रा: एस. एन. कांबळे यांनी आभार मानले.




**कोवाड : कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयामध्ये आयोजित कार्यक्रमात बोलताना डॉ. विलास नांदवडेकर. सोबत भरमू पाटील, ए. एस. जांभळे यांच्यासह मान्यवर.**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 SEP 2017
लोकमत

# प्राण्यांवरील क्रूरता थांबवा : उदयसिम्हा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** प्राण्यांवरील क्रूरता थांबविणे अत्यंत आवश्यक आहे, असे प्रतिपादन बंगलोरच्या लिगल कॅपॅसिटी बिल्डिंग या स्वयंसेवी संस्थेचे व्यवस्थापक उदयसिम्हा एन. जी. यांनी येथे केले. शिवाजी विद्यापीठामध्ये विधि अधिविभाग, ह्युमेन सोसायटी इंटरनॅशनल, इंडिया व बार कौन्सिल ऑफ इंडियातर्फे प्राण्यांच्या हितसंबंधांविषयक कायदे व हक्क यासंदर्भात आयोजित कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी अधिष्ठाता डॉ. भारती पाटील होत्या. या कार्यक्रमास यावेळी, प्राचार्या डॉ. मंगला पाटील-बडदारे, डॉ. जी. पी. माळी, अभिजित शितोळे, अर्चना कुलकर्णी आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 SEP 2017
पुढारी

# जागतिक ओझोन दिन शिवाजी विद्यापीठात साजरा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र विभागाच्या वतीने जागतिक ओझोन दिन विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला.

यानिमित्त वाद-विवाद, प्रश्नमंजूषा, पोस्टर स्पर्धा, रांगोळी स्पर्धा आणि फोटोग्राफी आदी स्पर्धा घेण्यात आल्या. 'जनुकीय विकसित वनस्पतींचा वापर व भारतीय सणांचे वास्तव' या विषयावर वाद-विवाद स्पर्धा, 'सेव्ह अर्थ,' 'गोइंग ग्रीन' व 'जगा व जगू द्या' या विषयांवर रांगोळी व फोटोग्राफी स्पर्धा आणि 'लिटर मेक्स द प्लॅनेट बिटर' यावर पोस्टर स्पर्धा घेण्यात आल्या. रांगोळी स्पर्धेचे मूल्यांकन महाराष्ट्र बँकेचे निवृत्त मॅनेजर व चित्रकार स्वरूप भोसले यांनी केले, तसेच पोस्टर व फोटोग्राफी स्पर्धेचे मूल्यांकन कलानिकेतन कला महाविद्यालयातील प्रा. शैलेश राऊत यांनी केले. वादविवाद स्पर्धेत नटराज शिरोळकर व सच्चिदानंद भोसले यांनी प्रथम क्रमांक मिळवला. प्रश्नमंजूषा स्पर्धेत प्रसाद मोहिते, विनायक साळुंखे व प्रणव महाजन यांच्या संघाने प्रथम क्रमांक मिळवला, तसेच आरती साबळे व हरिश सुतार यांनी रांगोळी स्पर्धेत यश मिळवले. कार्यक्रमास इंडियन सोसायटी ऑफ हीटिंग रेफ्रिजरेशन आणि एअर कंडिशनिंग इंजिनिअर्सचे कोल्हापूर-सांगलीचे सब चॅप्टर प्रमुख सुरेश पाटील, प्रमोद पुंगावकर, तसेच वाणिज्य व व्यवस्थापन शाखेचे ए. एम. गुरव प्रमुख उपस्थित होते. अध्यक्षस्थानी प्र- कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के होते. डॉ. पी. डी. राऊत यांनी प्रास्ताविक केले. अधिव्याख्याता डॉ. आसावरी जाधव यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. आभार राजेंद्र इंगवले यांनी मानले. सूत्रसंचालन गीतांजली मोरे व प्रणाली काळेबेरे या विद्यार्थिनींनी केले.